मौजे निळा, ता.पुर्णा, जि.परभणी येथील सन २००५ साली पुराने बाधित झालेल्या घरांचे पुनर्वसन कामावरील नुकसान भरपाई मिळणेबाबत कंत्राटदाराने केलेल्या कामांचे दावे तपासण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-२०१८/प्र.क्र.१८८/र-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १४ मे, २०१९

<u>वाचा -</u>

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-११-०५/प्र.क्र.२३९/म-३, दि.९.१.२००६
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-११-०५/प्र.क्र.२३९/म-३, दि.२.६.२००६
३) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएलएस-११-०५/प्र.क्र.२३९/म-३, दि.३१.३.२००८

<u>शासन निर्णय :-</u>

सन २००५ मधील अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित गावांचे पुनर्वसन, घरदुरुस्ती, घरांची पुनर्बांधणी, नागरी सुविधा इ. बाबत धोरण दि.९.१.२००६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले. सन २००५ च्या अतिवृष्टीने बाधित मौजे निळा (ता.पुर्णा, जि.परभणी) या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी मे बालाजी एजन्सीज, ठाणे यांची कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. पुनर्वसनाचे काम चालू करण्यासाठी कंत्राटदारास विविध अडचणीमुळे काम पूर्ण करण्यासाठी मोठा कालावधी लागला. सदर विलंब शासनामुळे झाला असल्याचा कंत्राटदाराने दावा केला असून, नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. कंत्राटदाराने केलेल्या नुकसान भरपाई दाव्याची तपासणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय - अध्यक्ष
२) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, - सदस्य
३) सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय - सदस्य
४) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय - सदस्य
५) उप सचिव (पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय - सदस्य सचिव

२. कंत्राटदाराने नुकसान भरपाईबाबत केलेल्या दाव्याची तपासणी/ छाननी करणे व त्यानुषंगाने शासनास शिफारस करणे, ही समितीची कार्यकक्षा राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१४१५०१३०८९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2019.05.14 15:11:20 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
४) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
५) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहाय्यक,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८) उपसचिव (पुनर्वसन) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती, कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.

*****